दै. प्रहार. १९/२/१६

# विविध अनुत्तरीत प्रश्नांची उकल करण्यासाठी चर्चासत्र उत्तम व्यासपीठ- डॉ. अभ्यंकर

## फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये आरएएसटी-२ के १६ द्वितीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन



▸ रत्नागिरी

कोणत्याही घटनेकडे पाहताना कधी, कशी पेक्षा 'का' या दृष्टिकोनातून पाहिल्यास विविध अनुत्तरीत प्रश्नांची उकल होऊ शकते. त्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्र व कार्यशाळा हे उत्तम व्यासपीठ ठरु शकते असे प्रतिपादन डॉ. आदित्य अभ्यंकर, अधिष्ठाता, तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी मध्ये होणाऱ्या आरएएसटी-२ के १६ द्वितीय राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी मध्ये रिसेंट ॲडव्हान्सेस इन सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी या द्वितीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन १७ फेब्रुवारी २०१६ रोजी झाले. तसेच आरएएसटी - २ के १६ या परिषदेमध्ये सादर करण्यात येणाऱ्या शोधनिबंधाच्या प्रोसिडिंगमध्ये उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्रा. डॉ.एस.एस. गोइलकर, उपप्राचार्य डॉ. कौशलप्रसाद, परिषदेचे प्रमुख संयोजक प्रा. व्ही.एस चौगुले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्राचा उत्तम समन्वय देशाला प्रगतीपथावर निश्चितपणे नेऊ शकतो. तसेच विविध अभियांत्रिकी शाखांनी एकत्रित होऊन काम करणे ही काळाची गरज असल्याचे मत बोलताना व्यक्त केले.

दै. पुढारी १९/२/१६

# चर्चासत्र परिषद हे उत्तम व्यासपीठ : डॉ. आदित्य अभ्यंकर

**रत्नागिरी : शहर वार्ताहर**

कोणत्याही घटनेकडे पाहताना कधी, कशी पेक्षा 'का' या दृष्टीकोनातून पाहिल्यास विविध अनुत्तरीत प्रश्नांची उकल होऊ शकते. त्यासाठी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्र कार्यशाळा हे उत्तम व्यासपीठ ठरू शकते, असे प्रतिपादन डॉ. आदित्य अभ्यंकर, अधिष्ठाता, तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये होणाऱ्या 'ठड्ढ - २घ१६' द्वितीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

फिनोलेक्स ॲकॅडमी ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये रिसेंट ॲडव्हान्सेस इन सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी या द्वितीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन दि. १७ फेब्रुवारी रोजी झाले. तसेच 'ठड्ढ - २घ१६' या परिषदेमध्ये सादर करण्यात येणाऱ्या शोधनिबंधांच्या प्रोसिडिंगचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोइलकर, उपप्राचार्य डॉ. कौशलप्रसाद, परिषदेचे प्रमुख संयोजक प्रा. व्ही. एस. चौगुले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी शैक्षणिक औद्योगिक क्षेत्राचा उत्तम समन्वय देशाला प्रगतीपथावर निश्चितपणे नेऊ शकतो. तसेच विविध अभियांत्रिकी शाखांनी एकत्रित होऊन काम करणे ही काळाची गरज असल्याचे मत बोलताना व्यक्त केले. फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये सुरू असलेली राष्ट्रीय परिषद शैक्षणिक, संशोधन क्षेत्रातील मान्यवरांना निश्चितच प्रोत्साहन देणारी ठरेल. तसेच या माध्यमातून अनेक संशोधक पुढे येऊ शकतील, असा विश्वास होप फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. अरुणा कटारा यांनी संदेशाद्वारे दिला.

फिनोलेक्स ॲकॅडमीचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोइलकर यांनीही मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. कौशलप्रसाद यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला तर प्रा. जी. जी. भिडे यांनी आभार प्रदर्शन केले.



**रत्नागिरी : फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये द्वितीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. आदित्य अभ्यंकर, सोबत व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एस. एस. गोइलकर, उपप्राचार्य डॉ. कौशलप्रसाद, परिषदेचे प्रमुख संयोजक प्रा. व्ही. एस. चौगुले आदी.**

दै. लोकमत
19/2/16



फिनोलेक्स अ‍ॅकॅडमीमध्ये आयोजित राष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधांच्या प्रोसिडिंगचे प्रकाशन डॉ. आदित्य अभ्यंकर, प्राचार्य गोईलकर, डॉ. कौशल प्रसाद यांच्याहस्ते करण्यात आले.

# प्रश्न सोडवण्यास चर्चासत्र हवे : अभ्यंकर

**रत्नागिरी :** कोणत्याही घटनेकडे पाहताना कधी व कशी यापेक्षा का? या दृष्टीकोनातून पाहिल्यास विविध अनुत्तरीत प्रश्नांची उकल होऊ शकते, त्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषद चर्चासत्र व कार्यशाळा हे उत्तम व्यासपीठ ठरु शकते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले.

येथील फिनोलेक्स अ‍ॅकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये होणाऱ्या 'आर. ए. एस. टी. - २ के १६' या द्वितीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

'रिसेंट अ‍ॅडव्हान्सेस इन सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी' या द्वितीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन बुधवारी झाले. तसेच 'आर. ए. एस. टी. - २ के १६' या परिषदेमध्ये सादर करण्यात येणाऱ्या शोधनिबंधांच्या प्रोसिडिंगचे उद्घाटन यावेळी करण्यात आले. यावेळी फिनोलेक्स अ‍ॅकॅडमीचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोईलकर, उपप्राचार्य डॉ. कौशल प्रसाद, परिषदेचे प्रमुख संयोजक व्ही. एस. चौगुले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

डॉ. अभ्यंकर यांनी शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्राचा उत्तम समन्वय देशाला प्रगतीपथावर निश्चितपणे नेऊ शकतो, तसेच विविध अभियांत्रिकी शाखांनी एकत्रित येऊन काम करणे, ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

उपप्राचार्य डॉ. कौशल प्रसाद यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला, तर जी. जी. भिडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला डॉ. वैशाली पाटील, डॉ. एस. एस. चव्हाण, डॉ. एस. पी. पाटील व डॉ. सी. वाय. सिमीकरी आदी तज्ज्ञ परीक्षक म्हणून काम पाहिले. (प्रतिनिधी)

दै. सकाळ
19/2/16.

# फिनोलेक्स अ‍ॅकॅडमीच्या टेकस्प्रिंगला प्रतिसाद

रत्नागिरी, ता. १७ : फिनोलेक्स अ‍ॅकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशन विभागाने टेकस्प्रिंग टू के १६ या टेक्निकल इव्हेंट घेण्यात आला. कोकणातील ६०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

यात टेक्निकल पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट प्रेझेंटेशन, सर्किट बिल्डिंग, स्पेल बी, स्नेक अँड ल्याडर, टेक फोटो आणि रोबालीम्पिक्स यासारख्या बहुआयामी स्पर्धांचा समावेश होता. आयोजनामागील मूळ उद्देश विद्यार्थ्यांच्या सुप्त बुद्धिकौशल्याना वाव देऊन त्यांच्या अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर सामाजिक उत्कर्षासाठी व्हावा हा होता.



रत्नागिरी : फिनोलेक्स अ‍ॅकॅडमीमध्ये 'टेकस्प्रिंग टू के १६' या टेक्निकल इव्हेंटचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ. एस. एस. गोइलकर. शेजारी जी. एस. कुलकर्णी, जी. जी. भिडे आदी.

उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. एस. गोइलकर यांनी केले. या वेळी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनचे विभागप्रमुख जी. एस. कुलकर्णी, इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख जी. जी. भिडे, शिक्षक प्रतिनिधी प्रा. हर्षदा बोडस आदी उपस्थित होते. या सर्वांनी सांघिक प्रयत्न, शिस्तबद्ध आखणी व सुसूत्र व्यवस्थापनाचे कौतुक केले. विविध स्पर्धांमध्ये विशेष नैपुण्य दाखवणाऱ्या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन गौरव केला.